SMT. NANKIBAI WADHWANI KALA MAHAVIDYALAYA, YAVATMAL
Department of Economics – 2026-27

Guidance on Competitive Examinations Provides Students With Information About Various Career Opportunities.

Date: 17 October 2026

A guidance programme was organized on 28 September 2026 on the occasion of Right to Information Day, jointly by the Departments of Economics and Political Science of Smt. Nankibai Wadhwani Arts College, Yavatmal.

The programme was presided over by the Principal of the college, Dr. Jayant M. Chatur. Prof. Sachin Wankhede of Amolakchand Mahavidyalaya, Yavatmal, served as the resource person. Advocate Shubham Rajendra Pundkar, associated with the District and Sessions Court, Yavatmal, and the High Court, Nagpur Bench, was the chief speaker and provided detailed guidance to the students on various aspects of the Right to Information.

During the programme, the speakers elaborated on the Right to Information Act, the rights of citizens to obtain information, the procedure for filing an RTI application, the responsibilities of public authorities, and the importance of transparency and accountability in a democratic system. The students were also guided on how to make effective and responsible use of the Right to Information.

The programme was compered by Prof. Dr. Kalpana S. Godghate, while the introductory remarks were delivered by Prof. Dr. Sanjay B. Rachalwar. In his introductory address, he highlighted the significance of Right to Information Day and emphasized that awareness of constitutional rights among students is essential for nurturing informed and responsible citizens.

At the conclusion of the programme, Prof. Dr. Kalpana S. Godghate proposed the vote of thanks. A large number of faculty members, non-teaching staff, and students attended the programme. The event proved to be informative and beneficial for the students, enhancing their awareness of the Right to Information and its significance in strengthening democratic governance.

Photo







News

लोकसत्र | गावाकडच्या बातम्या | यवतमाळ, मंगळवार, दि. २० ऑक्टोबर २०२५ | 3

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना करिअरच्या विविध संधींची माहिती



यवतमाळ : श्रीमती नानकीबाई वाधवाणी कला महाविद्यालय, यवतमाळ येथील अर्थशास्त्र विभागाच्या वतीने १७ ऑक्टोबर ६ रोजी 'स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन आणि करिअर निवडण्याच्या विविध क्षेत्रातील संधी' या विषयावर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. जयंत म. चतुर होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून द अदिभा करिअर रिसर्च ट्रेनिंग अँण्ड एज्युकेशनल इन्स्टिट्यूट, यवतमाळचे संचालक दीक्षांत हरिदास रामटेके उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांचे स्वरूप, विविध शासकीय सेवांमधील रोजगाराच्या संधी, करिअर निवडीसाठी आवश्यक कौशल्ये आणि स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी नियोजनाचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीनुसार आणि क्षमतेनुसार करिअरची निवड करून निश्चित ध्येयाने अभ्यास करावा, असे आवाहन त्यांनी केले. विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांकडे केवळ नोकरी मिळविण्याचे साधन म्हणून न पाहता, स्वतःचे भविष्य घडविण्याची संधी म्हणून पाहावे. योग्य नियोजन, सातत्यपूर्ण अभ्यास आणि स्पष्ट ध्येयाच्या बळावर विविध क्षेत्रांत यश संपादन करता येते, असे प्रतिपादन द अदिभा करिअर रिसर्च ट्रेनिंग अँण्ड एज्युकेशनल इन्स्टिट्यूट, यवतमाळचे संचालक दीक्षांत हरिदास रामटेके यांनी केले. अशा मार्गदर्शन कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांना करिअरविषयक योग्य दिशा मिळण्यास मदत होते. कार्यक्रमाचे संचालन व प्रास्ताविक अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. संजय राचलवार यांनी केले, तर आभार प्रा. डॉ. सिद्धार्थ जाधव यांनी मानले. या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची तयारी आणि करिअरच्या विविध पर्यायांविषयी उपयुक्त माहिती मिळाली. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

पुण्य नगरी

नानकीबाई वाधवाणी कला महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन



पुण्य नगरी / प्रतिनिधी

यवतमाळ : श्रीमती नानकीबाई वाधवाणी कला महाविद्यालय, यवतमाळ येथील अर्थशास्त्र विभागाच्यावतीने १७ ऑक्टोबर रोजी 'स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन आणि करिअर निवडण्याच्या विविध क्षेत्रातील संधी'या विषयावर मार्गदर्शन कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयंत म. चतुर होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून द अदिभा करिअर रिसर्च ट्रेनिंग अँड एज्युकेशनल इन्स्टिट्यूट, यवतमाळचे संचालक श्री. दिक्षांत हरिदास रामटेके उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांचे स्वरूप, विविध शासकीय सेवांमधील रोजगाराच्या संधी, करिअर निवडीसाठी आवश्यक कौशल्ये आणि स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी नियोजनाचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीनुसार आणि क्षमतेनुसार करिअरची निवड करून निश्चित ध्येयाने अभ्यास करावा, असे आवाहन त्यांनी केले. विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांकडे केवळ नोकरी मिळविण्याचे साधन म्हणून न पाहता, स्वतःचे भविष्य घडविण्याची संधी म्हणून पाहावे. योग्य नियोजन, सातत्यपूर्ण अभ्यास आणि स्पष्ट ध्येयाच्या बळावर विविध क्षेत्रांत यश संपादन करता येते, असे प्रतिपादन द अदिभा करिअर रिसर्च ट्रेनिंग अँड एज्युकेशनल इन्स्टिट्यूट, यवतमाळचे संचालक दिक्षांत हरिदास रामटेके यांनी केले. अशा मार्गदर्शन कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांना करिअरविषयक योग्य दिशा मिळण्यास मदत होते.

विद्यार्थ्यांना करिअरच्या विविध संधींची माहिती

कार्यक्रमाचे संचालन व प्रास्ताविक अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. संजय राचलवार यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. सिद्धार्थ जाधव यांनी केले. या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची तयारी आणि करिअरच्या विविध पर्यायांविषयी उपयुक्त माहिती मिळाली. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.